आधुनिक विचारांचे

# वर्तमान

बीड । बुधवार, २२ डिसेंबर २०२१ । वर्ष : ४ | आपले वृत्तपत्र, आपला आवाज | अंक : ७ । पाने : ४ । मूल्य २ ₹

## शिवरायांचा अवमान खपवून घेणार नाही : मुख्यमंत्री



मुंबई : छत्रपती शिवाजी महाराज केवळ आमचेच नाहीत तर सगळ्या देशाचे दैवत आहेत. त्यांचा अवमान तर दूर, कणभर अनादरही खपवून घेणार नाही. कर्नाटकातील मराठी जनतेवरील कानडी अत्याचार थांबवून या हिणकस आणि विकृत मनोवृत्तीचा बीमोड करण्यासाठी पंतप्रधानांनी क्षणाचाही विलंब न लावता स्वतः यात लक्ष घालावे आणि तेथील राज्य सरकारला संबंधितांवर त्वरित कडक कारवाई करण्यास सांगावे, अशा शब्दांत मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी भावना व्यक्त केल्या.

# छत्रपतींच्या विचारांची नवी पिढी घडवा

## मराठा भवन भूमिपूजनप्रसंगी आमदार प्रकाश सोळंके यांची साद

प्रतिनिधी

माजलगाव : छत्रपती शिवाजी महाराज यांचे कार्य आणि त्यांना आदर्श मानत असताना समाजबांधवांनी त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा अभ्यास करावा, त्यांच्या जीवनावरील ग्रंथसंपदा वाचावी आणि त्यातून मुलांना संस्काराचे धडे द्यावेत, अशी साद माजलगावचे आमदार प्रकाश सोळंके यांनी समाजबांधवांना दिली. ते माजलगाव येथे मराठा भवनाच्या भूमिपूजन सोहळ्यात उद्घाटक म्हणून रविवारी बोलत होते.

मराठा भवन भूमिपूजन सोहळ्याच्या अध्यक्षपदी नगराध्यक्ष शेख मंजूर तर प्रमुख पाहुणे म्हणून माजी आमदार मोहन सोळंके, राधाकृष्ण होके पाटील, आर.टी.देशमुख, सभापती जयसिंग सोळंके यांच्यासह सभापती अशोक डक, मोहन जगताप, रमेश आडसकर, गंगाधर काळकुटे, गंगाभिषण थावरे, सुरेश साबळे, अप्पासाहेब जाधव व इतर मान्यवर उपस्थित होते. या वेळी पुढे बोलताना सोळंके म्हणाले की, माजलगात शहरात होत असलेले मराठा भवन हे मराठवाड्यातील एकमेव मराठा भवन असून हे संपूर्ण समाजाला प्रेरणादायी असून गोरगरीब समाजबांधवांना हे आधार भवन ठरणार आहे.या भवनासाठी मी निधी कमी पडू देणार नसल्याची ग्वाही आमदार सोळंके यांनी दिली. ''हु वॉज शिवाजी'' हे पुस्तक लिहिलेले कॉ.गोविंद पानसरे लिखीत गावोगावी तरूणांनी वाचावे असे सोळंके म्हणाले. तर यावेळी आर.टी.देशमुख म्हणाले की, मराठा भवन चे दोन वर्षापूर्वी भूमिपूजन केले होते त्यास १० लाख रूपयांचा निधी आला व तो परत गेला तो परत आणण्यासाठी आपण प्रयत्न करून तो निधी वापस आणून भवनासाठी सर्वोतोपरी मदत करणार असल्याचे म्हणाले. हा भव्य भूमिपुजन सोहळा यशस्वी करण्यासाठी छत्रपती प्रतिष्ठानचे अध्यक्ष राजेंद्र होके पाटील, सचिव चंद्रकांत शेजुळ, सतिष सावंत, ॲड.भानुदास डक यांच्यासह नगरसेवक भागवत भोसले, नारायण होके, ईश्वर होके, रोहन घाडगे, विजय शिंदे, शरद यादव, विधिज्ञ अखिलेश घाडगे, पुरूषोत्तम जाधव, विलास कोळपे, रामराजे रांजवण, अंकुश शिंदे आदींसह मराठा समाजाचे नेते, हजारो कार्यकर्ते यांनी परिश्रम घेतले. यावेळी समाजाचे मुंबई बाजार समितीचे सभापती अशोक डक, सिव्हील सर्जन डॉ.सुरेश साबळे, डॉ.यशवंत राजेभोसले, ॲड.सुदर्शन सोळंके यांचा समाजाच्या वतीने मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. या सोहळ्याचे सूत्रसंचालन नारायण झोडगे, प्रा.रमेशराव गटकळ, दिलीप धुमाळ यांनी केले तर उपस्थितांचे आभार रामचंद्र डोईजड यांनी मानले.

### मराठा भवन निर्मितीसाठी ३ कोटींचा निधी अपेक्षित?

माजलगावात उभारले जाणारे मराठा भवन प्रशस्त बांधले जाणार आहे, यातून समाजोपयोगी उपक्रमांना प्राधान्य दिले जाईल. हे भवन महाराष्ट्रातील पहिले आणि ऐतिहासिक ठरणार आहे. त्यासाठी समाजाने मोठे योगदान दिले आहे. या भवनासाठी सुमारे ३ कोटी रूपये अपेक्षित असून त्यासाठी समाजातील दानशूर व्यक्तींनी पुढे येवून सहयोग देण्याचे आवाहन मराठा भवन समितीच्या वतीने करण्यात आले.







बातमी व जाहिरातीसाठी संपर्क

9423209823

मुख्यालय : 'शिवगड' २३, मुख्य रस्ता, मस्जिद चौक, माजलगाव जि.बीड

# एसटी कर्मचारी संपाची तलवार म्यान

## कनिष्ठ वेतन श्रेणी एसटी कामगार संघटनेची घोषणा

प्रतिनिधी

मुंबई : राज्यात जवळपास दोन महिने सुरू असलेल्या एसटी कर्मचाऱ्यांनी आपल्या संपाची तलवार म्यान केली आहे. दरम्यान, सोमवार, दि.२० डिसेंबर रोजी संप मागे घेत असल्याची घोषणा कनिष्ठ वेतन श्रेणी एसटी कामगार संघटनेने केली आहे.

राज्यात गेल्या ५४ दिवसांपासून सुरू असलेल्या एसटी संपाबाबत मोठी माहिती समोर आली आहे. अजय गुजर प्रणित कनिष्ठ वेतन श्रेणी एसटी कामगार संघटनेने या संपातून माघार घेतल्याची घोषणा केली आहे. परिवहन मंत्री अनिल परब आणि कनिष्ठ वेतन श्रेणी एसटी कामगार संघटनेची सोमवारी बैठक झाली. त्यामध्ये हा निर्णय घेतल्याची घोषणा करण्यात आली आहे. गेले ५४ दिवस एसटी संप सुरू आहे. संपकरी विलिनीकरणाच्या मुद्द्यावर ठाम असल्याने हे प्रकरण उच्च न्यायालयात गेले आहे. सोमवारी महाराष्ट्र राज्य कनिष्ठ वेतन श्रेणी संघटनेने सोमवारी परिवहन मंत्र्यांशी चर्चा केली. त्यानंतर हा निर्णय घेण्यात आला आहे. त्यामुळे मंत्रालयात चर्चा केली. त्यामुळे आता २२ डिसेंबरपर्यंत एसटी कर्मचाऱ्यांनी कामावर रुजू व्हावे, असे आवाहन कनिष्ठ वेतन श्रेणी एसटी कामगार संघटनेचे अध्यक्ष अजय गुजर यांनी केले आहे. मुंबईबाहेरचे कामगार, जे मुंबईत आंदोलनासाठी आले आहेत त्यांना कामावर रुजू होण्यासाठी अतिरिक्त दोन दिवस देण्यात आले आहेत. एकीकडे कनिष्ठ वेतन श्रेणी एसटी कामगार संघटनेचे अध्यक्ष अजय गुजर यांनी संप मागे घेतल्याची घोषणा केली आहे. तर दुसरीकडे ॲड.गुणरत्ने सदावर्ते हे आंदोलनावर ठाम आहेत. विलिनीकरणाची मान्य झाल्याशिवाय हे आंदोलन मागे घेतले जाणार नाही अशी भूमिका सदावर्तेंनी घेतली आहे. त्यावर बोलताना अजय गुजर म्हणाले की, आम्ही विलिनीकरणाच्या मुद्द्यावर ठाम आहोत, पण समितीच्या निर्णयाची वाट पाहत आहोत. गुणरत्न सदावर्ते हे आमचे वकील आहेत. जर त्यांना आमची भूमिका मान्य नसेल, त्यांना आमची केस लढायची नसेल तर आम्ही दुसरा वकील बघू, असेही गुजर म्हणाले.

### एसटी कर्मचाऱ्यांमध्ये फूट



कनिष्ठ वेतन श्रेणी एसटी कामगार संघटनेने संप माघार घेतल्याच्या निर्णयानंतर आझाद मैदानात आंदोलन करणाऱ्या कर्मचाऱ्यांनी विविध प्रतिक्रिया दिली आहे. विलिनीकरणाची मागणी मान्य झाल्याशिवाय आम्ही संप मागे घेणार नसल्याचे आंदोलकांनी सांगितले. त्यामुळे आता एसटी कर्मचारी संपामध्ये फूट पडल्याचं दिसून येत आहे.

### 'एसटी पूर्ववत होण्याची शक्यता'

परिवहन मंत्री अनिल परब म्हणाले की, एसटी विलीनीकरणाच्या मुद्द्यावर न्यायालयाच्या समितीचा निर्णय संपकरी आणि राज्य सरकार या दोन्ही बाजूंना मान्य आहे. तसेच शासकिय कर्मचाऱ्यांमध्ये वेतन मिळण्याबाबतच्या मागणीवरही राज्य सरकार संघटनेशी चर्चा करणार आहे. ज्या कर्मचाऱ्यांवर कारवाई करण्यात आली, ते कर्मचारी जर कामावर पुन्हा रूजू झाले तर त्यांच्यावरची कारवाई मागे घेतली जाईल. तसेच त्यांच्यावरील फौजदारी गुन्हे ज्यांच्यावर दाखल झाले आहेत त्यांची कायदेशीर प्रक्रिया पूर्ण झाल्यावर कारवाई मागे घेण्यात येणार आहे. दरम्यान, उद्यापासून एसटी पूर्ववत होण्याची शक्यता होईल, अशीही माहिती मंत्री परब यांनी दिली.

## फास्टट्रॅकन्यूज



### आजपासून विधीमंडळाचे हिवाळी अधिवेशन

मुंबई : आजपासून राज्याचे हिवाळी अधिवेशन सुरू होणार आहे. मुख्यमंत्र्यांच्या तब्येतीमुळे अधिवेशन नागपूरऐवजी मुंबईत होते आहे. यंदाचे अधिवेशन विविध मुद्द्यांनी गाजण्याची शक्यता आहे. ओबीसी आरक्षण, पेपरफुटी, परीक्षेतला विलंब, मराठा आरक्षण, शेतकरी प्रश्न अशा विविध मुद्द्यांवर या अधिवेशनात जोरदार गदारोळ होण्याची शक्यता आहे. आघाडी सरकारच्या कारभारावरून आणि नेत्यांवरच्या आरोपांवरून विरोधक सरकारला कोंडीत पकडण्याची चिन्हे आहेत. विधानसभा अध्यक्षपदाची निवडणूकही या अधिवेशनात होण्याची शक्यता आहे. या पार्श्वभूमीवर आज भाजप नेत्यांची दुपारी बैठक आहे. यात अधिवेशनातील रणनीतीवर खलबतं होणार असल्याची माहिती मिळत आहे. राज्याचे हे हिवाळी अधिवेशन वादळी ठरण्याची शक्यता आहे. आधीच नागपूरमध्ये न होणारे हिवाळी अधिवेशन आणि अधिवेशनाचा कमी कालावधी यामुळे विरोधक आक्रमक आहेत. त्यातच ओबीसीच्या राजकीय आरक्षणाबाबत सुप्रिम कोर्टाने दिलेल्या निकालामुळे ठाकरे सरकारची डोकेदुखी वाढवण्याची शक्यता आहे. टीईटी परीक्षा घोटाळा, म्हाडा पेपर फुटी प्रकरण यासारख्या मुद्यावरून भाजप अधिवेशनाच्या पहिल्याच दिवसांपासून सरकारची कोंडी करण्याची शक्यता आहे.

### 'जय महेश'चे अध्यक्ष माजलगावात



माजलगाव : येथे जय महेश साखर कारखान्याचे अध्यक्ष प्रभाकर राव यांचे स्वागत करताना शिवसेनेचे बीड जिल्हाप्रमुख अप्पासाहेब जाधव, सरपंच अनुप घाडगे समवेत शिवसेना उपजिल्हाप्रमुख रामराजे सोळंके, उद्योजक विठ्ठल जाधव, गणेश जाधव आदी.

## 'इंडियन स्पाईसी' लौकिकास पात्र ठरेल : आठवले

प्रतिनिधी

पुणे : नवनिर्मितीचा ध्यास घेत पुणे जिल्ह्यातील उद्योजक चंद्रकांत रासकर यांनी इंडियन स्पाईसी या आकर्षक नावाने हॉटेल सुरू केले आहे. ते दर्जा व गुणवत्तेच्या जोरावर ग्राहकांच्या पसंतीस उतरेल, असे गौरवोद्गार केंद्रीय सामाजिक न्याय राज्य मंत्री तथा रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियाचे राष्ट्रीय अध्यक्ष रामदास आठवले यांनी काढले. ते पिंपरी-चिंचवड परिसरातील मोशी येथे इंडियन स्पाईसी हॉटेलच्या उद्घाटन प्रसंगी बोलत होते.



यावेळी इंडियन स्पाईसीचे संचालक चंद्रकांत गुलाबराव रासकर, राजेंद्र गुलाबराव रासकर, सौरभ राजेंद्र रासकर यांनी मंत्री रामदास आठवले यांचा सन्मान केला. प्रास्ताविक चंद्रकांत रासकर यांनी केले. याप्रसंगी उद्घाटनपर शुभेच्छा देताना मंत्री रामदास आठवले म्हणाले, पिंपरी-चिंचवड परिसरातील मोशी येथे इंडियन स्पाईसी हॉटेल खाद्यसंस्कृतीला नवी चालना देणारे ठरेल. ग्राहकांना आदरातिथ्य करण्यात कुठेही रासकर बंधू कमी पडणार नाहीत, असा आशावादही मंत्री आठवले यांनी व्यक्त केला. या कार्यक्रमास दिल्लीस्थित मंत्री रामदास आठवले यांचे विश्वासू सहकारी शरद जमदाडे यांच्यासह अनेक मान्यवरांची प्रमुख उपस्थिती होती.

# सायरस पुनावाला यांना भारतरत्न किताब द्या

## खासदार डॉ.श्रीकांत शिंदे यांची पंतप्रधानांकडे मागणी

प्रतिनिधी



नवी दिल्ली : कोरोना लढ्यातील योगदान लक्षात घेता सिरम इन्स्टिटयूटचे सायरस पूनावाला यांना केंद्र सरकारने भारतरत्न किताब देऊन सन्मानित करावे, अशी मागणी शिवसेना खासदार डॉ.श्रीकांत शिंदे यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याकडे केली आहे.

सिरम इन्स्टिटच्यूटचे सायरस पूनावाला यांना भारतरत्न द्यावा, अशी मागणी शिवसेना खासदार डॉ.श्रीकांत शिंदे यांनी केली आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना खासदार डॉ.श्रीकांत शिंदे यांनी पत्र लिहून सायरस पूनावाला यांना भारतरत्न द्यावा, अशी मागणी केली. कोरोना काळात सायरस पूनावाला यांनी केलेल्या कामाची दखल घेत त्यांचा गौरव करण्यात यावा, असे शिंदे यांनी आपल्या पत्रात म्हटले आहे. सायरस पूनावाला यांनी पुण्यातील सिरम इन्स्टिटयूट ऑफ इंडिया ही लस बनवणाऱ्या कंपनीची निर्मिती केली. लस बनवणारी ही जगातील सर्वात मोठी कंपनी आहे. कोरोना प्रतिबंधक लसीची निर्मितीही मोठ्या प्रमाणात झाली.

सायरस पुनावाला हे राष्ट्रवादीचे अध्यक्ष शरद पवार यांचे वर्गमित्र होत.



सायरस पुनावाला यांनी पुण्यातील हडपसर भागात १९६६ साली सिरम इन्स्टिट्यूट ऑफ इंडियाची स्थापना केली. सायरस पूनावाला यांना शर्यतीच्या घोड्यांमध्ये रस होता. घोड्यांच्या रक्ताचा उपयोग अनेक प्रकारच्या लसी तयार करण्यासाठी केला जातो. त्यातूनच सायरस पूनावाला हे लस निर्मितीच्या व्यवसायात उतरले आणि सिरम इन्स्टिट्यूटचा प्रवास सुरू झाला. सिरम इन्स्टिट्यूटकडून पोलिओ, डायरीया, हिपॅटायटस, स्वाईन फ्लू अशा अनेक आजारांवरील लसींची निर्मिती येथे केली जाते.

आज जगभरात वेगवेगळ्या आजारांवरती ज्या लसींचा उपयोग केला जातो त्यापैकी ६५ टक्के लसी या सिरम इन्स्टिटच्यूटमध्ये तयार होतात. कोरोनावरील लस तयार करण्यासाठी सिरम इन्स्टिट्यूटचा ऑक्स्फर्ड युनिव्हर्सिटी आणि स्ट्रा झेनेका यांच्या सोबत करार झाला आहे. कोरोना काळात सिरम इन्स्टिटच्यूटकडून देशभरात आणि विदेशातही लसपुरवठा करण्यात आला. याच कामाचा दाखला देत शिवसेना खासदार डॉ.श्रीकांत शिंदे यांनी सायरस पूनावाला यांना भारतरत्न किताब देण्याचा प्रस्ताव पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याकडे ठेवला आहे. डॉ.श्रीकांत शिंदे यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना पत्र लिहून सायर पूनावाला यांना भारतरत्न किताब देण्याची मागणी केली आहे.

वर्तमान प्रतिबिंब

रहा ऑनलाईन कनेक्ट..

www.vartmannews.in

या वेबसाईटला भेट द्या !

## संपादकीय

### लघु उद्योगाला नवसंजीवनी देण्यासाठी...

केंद्र सरकारने लघु उद्योजकांना उर्जितावस्था मिळवून देण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न सुरू केले आहेत. सुक्ष्म, लघु व मध्यम उपक्रमांच्या सर्वांगीण विकासासाठी औद्योगिक समूह विकासाची संकल्पना केंद्र शासनाने स्वीकारली आहे. यास अनुसरून केंद्र शासनाने औद्योगिक समूहांच्या विकासासाठी योजना जाहीर केल्या आहेत. केंद्र शासनाच्या सुक्ष्म, लघु व मध्यम मंत्रालयामार्फत सुक्ष्म व लघु उपक्रमासाठी सुधारित सुक्ष्म, लघु उपक्रम-समूह विकास योजना दिनांक १० फेब्रुवारी २०१० रोजी घोषित केली आहे. सदर योजनेतून सुक्ष्म व लघु उपक्रमाच्या सर्वांगीण विकास व वाढीकरिता क्षमतावृद्धी कार्यक्रम अंमलबजावणीसाठी तसेच सामायिक सुविधा निर्मितीसाठी अनुदान देण्यात येते. सामायिक सुविधा केंद्राअंतर्गत संशोधन व विकास केंद्र, पॅकेजिंग केंद्र चाचणी तसेच प्रशिक्षण केंद्र, सामायिक जलनिस्सारण केंद्र, सामायिक प्रक्रिया केंद्र इत्यादी बाबींचा समावेश होतो. सुक्ष्म आणि लघु उद्योगांसाठी समूह विकास योजना सुक्ष्म आणि लघु उद्योगासाठी समूह विकास योजनेसाठी औद्योगिक संघटना किंवा औद्योगिक समूह अर्ज करू शकतात. कमतरतांचा शोध, आवश्यक हस्तक्षेप, सामायिक सुविधा केंद्राची स्थापना, पायाभूत सुविधांचा विकास म्हणजेच नूतनीकरण किंवा नवनिर्माण असे या योजनेचे स्वरूप आहे. कमतरतांच्या शोध खर्चाची कमाल मर्यादा दोन कोटी ५० लाख रुपये आहे. छोट्या उद्दिष्टांसाठीच्या हस्तक्षेप प्रकल्पाची कमाल किंमत पंचवीस लाख आहे. केंद्र सरकारचे सहकार्य ७५ टक्के असे राहील. मोठ्या उद्दिष्टांसाठीचा हस्तक्षेप, सामायिक सुविधा केंद्राची निर्मिती एकूण प्रकल्पाची कमाल खर्च मर्यादा १५ कोटी रुपये असून यात सरकारचा हिस्सा ७० टक्के राहील. सध्या अस्तित्वात असलेल्या अथवा नव्या औद्योगिक क्षेत्रात पायाभूत सुविधांचा विकास प्रकल्पासाठी खर्च मर्यादा दहा कोटी रुपये असून यात सरकारचा हिस्सा ६० टक्के राहील. सुक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योग घटक उद्योगांच्या शाश्वत विकासासाठी, प्रगतीसाठी सहकार्य करणे, त्यांना तंत्रज्ञान विकास कौशल्य आणि दर्जा बाजारपेठांची उपलब्धता आणि भांडवल अशा सामायिक समस्या सोडविण्यासाठी मदत करणे, हा या योजनेचा प्रमुख उद्देश आहे. सुक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योग घटकांना स्वमदत गट, समूह संघटना स्थापन करून त्याद्वारे सर्वांना लाभदायी ठरणारे उपक्रम राबविता येतील. सध्या अस्तित्वात असलेल्या किंवा नव्याने उभ्या राहत असलेल्या औद्योगिक परिसरात किंवा समूहाच्या परिसरात औद्योगिक सुविधा निर्माण करणे किंवा त्या अद्ययावत करणे तसेच सामायिक सुविधा केंद्र उभारणे, असे आणखी या योजनेचे फायदे आहेत. यासाठीचे अर्ज केवळ ऑनलाइन पद्धतीने स्वीकारले जातात. या अर्जाची प्रत राज्य सरकार किंवा सरकारने नेमलेल्या स्वायत्त संस्था किंवा एमएसएम ई-मंत्रालयाच्या अंतर्गत येणाऱ्या संस्थांमार्फत पाठविता येईल. मात्र हा अर्ज एमएसएम ई-क्लस्टर डेव्हलपमेंट प्रोग्रामच्या सुकाणू समितीने मंजूर करणे आवश्यक आहे. उद्योग संचालनालय, मुंबईद्वारा सदर औद्योगिक समूह विकास योजनांची राज्यात प्रभावी अंमलबजावणी होण्यासाठी औद्योगिक समूहांच्या विकासासाठी कार्यवाही करण्यात येत आहे. सामायिक सुविधा केंद्राची प्रकल्प किंमत मर्यादा १० कोटींवरून १५ कोटींपर्यंत वाढवलेली आहे. ज्यामध्ये केंद्र शासनाचा सहभाग ७० ते ९० टक्के इतका राहील. पायाभूत सुविधांच्या विकासासाठी प्रकल्प किंमत मर्यादा १० कोटी असून ज्यामध्ये केंद्र शासनाचा सहभाग ६० टक्के राहील. क्षमतावृद्धी कार्यक्रमासाठीची प्रकल्प किंमत मर्यादा १० लाख रूपये इतकी आहे. दिनांक २७ जुलै २०१६ रोजीच्या सदर योजनेच्या सुधारित मार्गदर्शक तत्त्वांनुसार केंद्र शासनामार्फत निदानोपयोगी अभ्यास अहवाल व क्षमतावृद्धी कार्यक्रमाच्या अंमलबजावणीसाठी यापुढे केंद्र शासनाचे अनुदान देण्यात येणार नाही; परंतु प्रकल्पाचा सविस्तर प्रकल्प अहवाल मंजूर झाल्यानंतर १० लाख रूपये रक्कम विशेष हेतू वाहन संस्थेची सहभाग वर्गणी म्हणून मान्य करण्यात येईल. सामायिक सुविधा केंद्र आणि पायाभूत सुविधांच्या विकासासाठी तयार करावयाच्या विस्तृत प्रकल्प अहवालासाठीची किंमत मर्यादा ५ लाख रुपयांपर्यंत अनुज्ञेय असेल. विशिष्ट भौगोलिक क्षेत्रावर कार्यरत एकाच प्रकारच्या, औद्योगिक प्रवर्गातील किमान २० सुक्ष्म, लघु कार्यरत घटकांना योजनेचा लाभ मिळेल. यासाठी केंद्र सरकार पुढाकार घेत आहे. जनतेने या विविध योजनांची माहिती घेऊन लाभ घेणे गरजेचे आहे.

# शरद पवार आणि दिल्लीचे तख्त

**राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष, ज्येष्ठ नेते शरद पवारांचा वाढदिवस नुकताच झाला. या निमित्ताने २०२४च्या लोकसभा निवडणुकीत चमत्कार घडवण्याची चर्चा रंगायला लागलीय. पवारांनी देशाचं नेतृत्व करावं असं पक्षाच्या कार्यकर्त्यांना वाटतंय. पण त्यांनी व्यक्त केलेली भावना आणि नेमकं वास्तव काय हेही समजून घ्यायला हवं.**

राजकारण

**विजय जाधव**





राष्ट्रवादी काँग्रेसचे राष्ट्रीय नेते शरद पवारांचं कर्तृत्व, विकासातलं योगदान, शाहू, फुले, डॉ.आंबेडकरांच्या विचारांचा वारसा, सामाजिक जाण, भूमिका आणि अभ्यास मोठा आहे. देशाचं नेतृत्व करण्याची क्षमता त्यांच्यात नक्कीच आहे. महाराष्ट्राला दिशा देणाऱ्या या नेत्यानं आता देशाचंही नेतृत्व करावं, ही त्यांच्या तमाम कार्यकर्त्यांची भावना आहे आणि ती आजची नाहीय. पण, तेवढंच पुरेसं आहे का? पवारांच्या नेतृत्वाखाली तिसरी आघाडी बनणार का? देशाला ठोस विरोधी पक्ष मिळणार का? अश्या कळीच्या प्रश्नांवर आत्ताच चर्चा झाली पाहिजे.

अंतर्गत वादाचा फटका

काँग्रेसच्या नेत्या सोनिया गांधींना त्या विदेशी असल्याच्या मुद्द्यावर पवारांनी विरोध केला. काँग्रेसमधून बाहेर पडले. त्यांच्याकडं काँग्रेसचं नेतृत्व दिलं गेलं नाही. त्यालाही आता २० वर्ष लोटली. त्यावेळी केंद्रीय राजकारणात पवारांचा मोठा दबदबा होता. तिसऱ्या आघाडीचे प्रयोग जोरात सुरू होते. जनमताचा कौलही कोणत्याही एका पक्षाच्या बाजूनं नव्हता. तेव्हाही काँग्रेसला सत्तेबाहेर ठेवायचं धोरण भाजपसह तिसऱ्या आघाडीनं आखलं होतं. पवारांकडं आघाडीचं नेतृत्व देण्यावर काही घडलं असतं, तर ते तेव्हाच घडू शकलं असतं; पण आघाडीच्या राजकारणात पवारांना पक्षीय संख्याबळ देता आलं नाही. काँग्रेसमधली फूट पथ्यावर पडून मोठ्या संख्येनं खासदार बाहेर पडतील, पवारांच्या पाठीशी उभे राहतील, असं वाटत होतं. तसं झालं नाही. अर्थात, काँग्रेसच्या माघारीमुळं भाजपला चाल मिळाली आणि एनडीए पुढं झाली.

संख्याबळाची प्रादेशिक' गणितं

केंद्रातल्या सत्तेला पर्याय देण्याची, सर्वसामान्यांच्या प्रश्नांकडं लक्ष वेधण्याची, विचारसरणीतले भेद मांडण्याची पवारांची धडपड प्रकर्षानं जाणवतेय. भाजपाला पर्याय देण्याची भाषा बोलणाऱ्या मोजक्याच नेत्यांमधे ते आघाडीवर आहेत. दिल्लीच्या सत्तेबद्दल आपल्याकडे संख्याबळ आहे कुठे?' असा प्रतिसवाल ते करतात. चार-पाच खासदारांच्या बळावर ही लढाई जिंकता येत नाही, याचं भान त्यांना आहे. दुसरीकडं त्यांना एकतर केंद्रात पुन्हा एकदा सत्ताबदल शक्य आहे हे दिसू लागलंय किंवा त्या शक्यतांची पडताळणी त्यांना करायची आहे. महाराष्ट्रातल्या सत्ताप्रयोगानं त्यांना मोठं बळ मिळालं. केंद्रात भाजप बहुमतात बसला असला, तरी प्रादेशिक राजकारणात तो हुकमी एक्का नाही. पश्चिम बंगालच्या निवडणूक निकालानं भाजपला बाजूला सारण्याच्या पवार आणि ममतांच्या महत्त्वाकांक्षेला पुन्हा पालवी फुटलीय. तामिळनाडू आणि आंध्र प्रदेशात द्रमुक आणि वायएसआर काँग्रेसचं संख्याबळ मोठं आहे. ते पक्ष ऐन मैदानात कोणती भूमिका घेणार, हा प्रश्न वेगळा. शिवसेनेची ताकदही कामी येणारे आहे. तृणमूल काँग्रेसची संख्या २२ आहे. राष्ट्रवादी काँग्रेसकडं फक्त पाच खासदार. हे एकत्रित बळही शंभरावर जात नाहीय. तरीही पवार आणि ममता हे दोन नेते नव्या आघाडीसाठी सरसावलेत.

काँग्रेसला बेदखल करणं अशक्य

ममतांना काँग्रेस नको आहे. आपल्या नेतृत्वाखाली आघाडीची मोट नव्यानं बांधता येईल, असं त्यांचं मत आहे. काँग्रेसला सोबत घेतल्याशिवाय हे राष्ट्रीय राजकारण शक्य नाही, असं पवारांना वाटतं. पण काँग्रेसला वगळून काहीच घडणार नसलं तरी त्या शक्यताही पडताळल्या जातायत. जुन्या चुका टाळण्याची खबरदारी पवार घेत असले, तरी अनेक पर्यायांवर चर्चा सुरू झाल्यात. काँग्रेसला वगळून प्रादेशिक पक्षांची आघाडी, काँग्रेसच्या सहभागानं समविचारी पक्षांची आघाडी, काँग्रेसच्या पाठिंब्यानं नवी आघाडी, असे हे पर्याय असतील. मात्र, काँग्रेसची भूमिका निर्णायक असेल, यामुळंच पंतप्रधान नरेंद्र मोदींनी आजही हा पक्ष बेदखल केलेला नाही. झोपलेली काँग्रेस कधी जागी होईल, हे सांगता यायचं नाही. काँग्रेसला पोखरून काढायचं काम काँग्रेसपेक्षा तिसऱ्या आघाडीनं केलं होतं. भाजपसाठी राजकीय पटलावर मोठी जागा करून दिली होती, हा इतिहास आहे.

भाजप'चं कडवं आव्हान

भाजप अजूनही राजकीय पटलावर आपल्या उत्कर्षबिंदूवर पोचलेला नाही, असं वक्तव्य अलीकडेच पक्षाच्या एका ज्येष्ठ नेत्यानं केलं होतं. त्याची नोंद विरोधी पक्षांनी किती आणि कशी घेतली माहीत नाही. पण ती बाजू तपासून घेतलं तर भारतीय राजकारणाच्या मंचावर आणि जनमानसावर अधिराज्य गाजवण्याचे आणखी काही प्रयोग' या पक्षाला करायचे आहेत, असं दिसतं. भाजपला सत्तेवर आणायच्या आणि सत्ता टिकवून ठेवायच्या दीर्घकालीन धोरणाचा तो महत्त्वाचा टप्पा इथून पुढं म्हणजे २०२४च्या लोकसभा निवडणुकीनंतर सुरू होईल, असं दिसतं. देशाला एका समान धाग्यात बांधण्याचं आणि दुसरे पर्याय उभे राहू न देता आपली अपरिहार्यता स्पष्ट करण्याचं आणि ती देशावर नकळतपणे लादण्याचं ते धोरण यापुढच्या राजकारणाची दिशा ठरवेल. सत्तेसाठीची ठोस पार्श्वभूमी तयार करण्यात आणि जनमानसाच्या मनोभूमीवर मनसोक्त खेळण्यात भाजपला आलेलं यश' हे त्यामागचं खरं कारण.

विरोधी पक्षांची जबाबदारी

महागाई, बेकारीसारखे अनेक प्रश्न डोक्यावर असताना लोक का गप्प आहेत? इंधनाच्या दरानं शंभरी ओलांडली असताना लोक अजूनही गप्प का आहेत? ते रस्त्यावर येत नाहीत, आंदोलनं करत नाहीत, आक्रोश मांडत नाहीत, ते का? या प्रश्नांमधे ते कारण दडलंय. त्यामुळेच प्रश्न आहेत कुठं, असाही प्रश्न सरकारच्या बाजूनं विचारला जाऊ शकतो. देशाच्या राजकारणाचा तुटका-फुटका' कौल बाजूला पडून आता भाजप केंद्रित आणि विशेषत: पंतप्रधान मोदीकेंद्रित एकपक्षीय राजकारणाचं वारं आहे. एनडीएची गरजच उरणार नाही, अशी पक्षाची वाटचाल आहे. जनमानसातल्या खदखदीला तोंड फोडण्यात विरोधी राजकीय पक्ष किती यशस्वी होतात, त्यावरच विरोधी सशक्त आघाडीच्या शक्यतांना बळ मिळेल.

पक्षबांधणीची नितांत गरज

समाजातील प्रत्येक घटकात देश बदलण्याची ताकद आहे. त्याचं दु:ख समजून घ्या. त्या आधारावर समाजकारण, राजकारण केलं तर देशाचा चेहरा बदलल्याशिवाय राहणार नाही', हे पवारांनी वस्तुस्थितीला धरून केलेलं आवाहन कार्यकर्त्यांना दिशा दाखवणारं आहे. सत्तेसाठी या सत्याच्या मार्गावरून जाण्याची कोणाची तयारी आहे का, हा खरा प्रश्न आहे. काँग्रेसी विचारांचं आणि चळवळीचं आकुंचन, कमकुवत नेतृत्व, सर्वसमावेशक राजकारणाची संपत चाललेली गरज या गोष्टी सर्वाधिक चिंतेच्या म्हणाव्या लागतील. देशाला राजकीय पर्याय देण्याची ताकद याच विचारात आहे.

# कोरोना काळातील सुरक्षा कवच

**तिसऱ्या लाटेची शक्यता विचारात घेऊन केंद्र सरकारने कोरोना उपचाराला कवच देणाऱ्या विमा पॉलिसीचा कालावधी मार्च २०२२ पर्यंत वाढवलाय. कोरोना रक्षक आणि कोरोना कवच विमा पॉलिसी या बऱ्यापैकी स्वस्त विमा योजना आहेत. महाराष्ट्रात ओमायक्रॉन बाधित पेशंटची संख्या वाढत चाललीय. त्यामुळे आता अशा प्रकारच्या पॉलिसीची खरेदी करून कोरोनाच्या उपचाराला विमा सुरक्षा कवच घेणं गरजेचं आहे.**

हेल्थप्लस

**विधिषा देशपांडे**



कोरोनाच्या तिसऱ्या लाटेचे संकेत मिळतायत. भारतात नवीन वेरियंट ओमायक्रॉनने धडक मारली आहे. महाराष्ट्रातही ओमायक्रॉन बाधित पेशंटची संख्या वाढत चाललीय. त्यामुळे सरकार आणि आरोग्य विभागाकडून उपचाराची पुरेशी व्यवस्था केली जात आहे. कोरोनाचा नवीन वेरियंटही फुफ्फुसात संसर्ग पसरवत असल्याचं काहींनी सांगितलंय. संसर्गापासून वाचायचं तर सगळ्यांनी सुरक्षेच्या उपायांकडे लक्ष देणं फार गरजेचं आहे. लस घेणं, मास्क वापरणं, सोशल डिस्टन्सिंग पाळणं, गर्दी टाळणं यासारख्या गोष्टी करायला हव्यात. पण एखादा व्यक्ती बाधित असेल तर त्यासाठी पुरेसे पैसे हाताशी असणं गरजेचं आहे.

विमा पॉलिसीची कालावधी वाढवला

ज्यांच्याकडे पैशाची अडचण आहे, त्यांना काही प्रमाणात अडचणी येऊ शकतात. पण लोकांनी घाबरून जाण्याची गरज नाही. कारण, सरकारने कोरोना उपचाराला कवच देणाऱ्या विमा पॉलिसीची कालावधी मार्च २०२२ पर्यंत वाढवलाय. एखादा व्यक्ती आर्थिकदृष्ट्या सक्षम नसेल तर त्याने कोरोना कवचसारखी विमा पॉलिसी खरेदी करणं गरजेचं आहे. विमा नियामक संस्था इर्डा'ने विमा कंपन्यांनाही कोरोनाशी संबंधित सर्व दावे तातडीने निकाली काढावेत, असं म्हटलंय.

दोन प्रकारच्या विमा पॉलिसी

प्रत्येक व्यक्तीला कोरोनाची पहिली आणि दुसरी लाट लक्षात असेल. दुसऱ्या लाटेचा हल्ला एवढा तीव्र होता की, बेड अपुरे पडले होते. ऑक्सिजनची टंचाई निर्माण झाली होती. अशावेळी काही खासगी हॉस्पिटलनी अव्वाच्या सव्वा रक्कम आकारून लोकांकडून पैसे वसूल केले. त्यामुळे गरीब लोकांना उपचार करणं कठीण गेलं. त्या सगळ्या परिस्थितीत लोकांना उपचाराचा खर्च मिळवून देण्यासाठी विमा नियामकने सर्व विमा कंपन्यांना कोरोना रक्षक आणि कोरोना कवच नावाची विमा पॉलिसी लाँच करायला सांगितलं. विमा कंपन्यांनी सामाजिक बांधिलकीच्या माध्यमातून कोरोना रक्षक आणि कोरोना कवच पॉलिसी लाँच केली आणि लोकांच्या अडचणी कमी केल्या. तिसऱ्या लाटेची शक्यता पाहता सरकारने या शॉर्ट टर्म पॉलिसीचा कालावधी वाढवून तो मार्च २०२२ पर्यंत केलाय. या पॉलिसीला मार्च २०२२ पर्यंत खरेदी करता येऊ शकतं आणि त्याचं नूतनीकरण करता येईल. त्यामुळे आता अशा प्रकारच्या पॉलिसीची खरेदी करून कोरोनाच्या उपचाराला विमा सुरक्षा कवच घेणं गरजेचं आहे.

दोन्ही पॉलिसींची वैशिष्ट्यं

इर्डा'च्या निर्देशानुसार विमा कंपन्यांनी कोरोनाच्या उपचाराला कवच देण्याच्या उद्देशाने कोरोना रक्षक आणि कोरोना कवच यांसारख्या पॉलिसी बाजारात आणल्या आहेत. किमान ५० हजार आणि कमाल ५ लाख रुपयांपर्यंत कवच असणाऱ्या या पॉलिसीचा हप्ता हा ४४७ रुपयांपासून सुमारे ५५०० दरम्यान आहे. या कवचामधे हॉस्पिटलचा दैनंदिन खर्च, औषधं, डॉक्टरची फी, हॉस्पिटलच्या इतर खर्चाचा समावेश केलेला असतो. जर एखाद्या व्यक्तीचं वय ३५ असेल तर त्याला ४५० रुपयांच्या हप्त्यावर ५० हजारांचं कवच मिळेल. याशिवाय पॉलिसीचा कालावधी साडेतीन महिन्यांपासून ९.५ महिन्यांपर्यंत ठेवण्यात आला आहे. जर बाधित व्यक्ती घरात राहून उपचार करत असेल तर त्यावरही तत्काळ दावा मिळेल. पण यासाठी पेशंटला सरकारमान्य केंद्रावर कोरोनाची टेस्ट करावी लागेल. त्यात घरातच चौदा दिवसांपर्यंत उपचार करण्याची सवलत देण्यात येते.

सगळ्यात स्वस्त पॉलिसी

कोरोना रक्षक आणि कोरोना कवच विमा पॉलिसी या बऱ्यापैकी स्वस्त विमा योजना आहेत. सर्वसाधारण ३१ ते ५५ वयोगटातली कोणतीही व्यक्ती केवळ २२०० रुपयांचा हप्ता देऊन अडीच लाखांपर्यंत कवच मिळवू शकते. पती-पत्नी आणि मुलांसाठी ४७०० रुपयांचा हप्ता भरावा लागतो. कोरोना रक्षक आणि कोरोना कवच विमा पॉलिसीसाठी घेण्यात येणारा हप्ताही एकरकमी असतो आणि जवळपास सर्वच कंपन्यांचा हप्ता सारखाच असतो. याशिवाय कोरोना रक्षक आणि कोरोना कवच विमा पॉलिसीच्या अटी आणि संरक्षणही जवळपास सारखंच असतं. यात फरक असला तरी तो खूपच किरकोळ असतो.

# कोविशिल्ड बनवणाऱ्या सिरम इन्स्टिट्यूटचा कणा

**कोरोनाला आळा घालण्यासाठी ज्या लसींचा शोध लावण्यात आला त्यापैकी एक कोविशिल्ड होती. प्रशासनाने लसीकरणाची प्रक्रिया राबवताना आपला पुरेपूर राजकीय फायदाही पाहिला. स्वत:चं कौतुक करण्याची एकही संधी न सोडणाऱ्या सरकारने या लसीमागे राबणाऱ्या हातांना मात्र कायमच उपेक्षित ठेवलं. या लसीच्या शोधासाठी आकाशपाताळ एक करणारं मराठमोळं नाव होतं डॉ.सुरेश जाधव.**

विशेष

**प्रथमेश हळंदे**



वॉशिंग्टनच्या विमानतळावर उतरलेले ते भारतीय शास्त्रज्ञ हॉटेलवर जाण्यासाठी टॅक्सीत बसले. नेहमीच्या शिरस्त्याप्रमाणे त्यांनी टॅक्सी ड्रायवरशी गप्पा मारायला सुरवात केली. गप्पा मारता मारता त्यांनी सहजच आपल्या संस्थेविषयी आणि कामाविषयी त्या ड्रायवरला सांगितलं. हॉटेलपाशी गाडी थांबल्यावर त्यांनी आपलं भाडं दिलं पण त्या चालकाने भाडं घ्यायला नकार दिला. त्या शास्त्रज्ञांना आश्चर्य वाटलं पण त्यामागचं कारण ऐकल्यावर त्यांचा उर अभिमानानं भरून आला. तो ड्रायवर बुर्कीना फासो या लहान आफ्रिकी देशाचा रहिवासी होता. या देशात मेंदूज्वराच्या आजाराने धुमाकूळ घातला होता. त्यावेळी भारतातल्या एका मेडिकल संस्थेमधून या रोगावरची प्रतिबंधक लस तिकडे पाठवली गेली. ही लस घेतल्यामुळे त्या ड्रायवरचं कुटुंब वाचलं होतं. माझ्या देशातल्या करोडोंचा जीव वाचवणारं औषध तुम्ही बनवलंत, त्या बदल्यात ही फुल ना फुलाची पाकळी म्हणत त्या चालकाने नम्रपणे भाडं घ्यायला नकार दिला. ती भारतीय संस्था होती पुण्याची सिरम इन्स्टिटयूट तर या संस्थेचं आंतरराष्ट्रीय स्तरावर प्रतिनिधित्व करणारे ते शास्त्रज्ञ होते डॉ. सुरेश जाधव. डॉ. जाधव यांचं नुकतंच निधन झालंय. त्यानिमित्ताने त्यांच्या प्रवासावर टाकलेला हा प्रकाश.

डॉ.सुरेश जाधव हे मूळचे विदर्भातल्या अमरावतीचे. तल्लख बुद्धिमत्तेचे धनी असलेल्या जाधवांनी नागपूर युनिवर्सिटीमधून फार्मसीची पदवी आणि पीएचडी मिळवली. वयाच्या एकविसाव्या वर्षी त्यांना वैज्ञानिक आणि औद्योगिक संशोधन महामंडळात संशोधन शिष्यवृत्ती मिळाली.

त्यानंतर काही काळ त्यांनी नागपूर आणि हाफकिन संस्था, मुंबई इथं औषधनिर्मिती विभागात प्राध्यापक म्हणून काम केलं. वयाच्या तिसाव्या वर्षी जाधव पुण्याच्या सिरम इन्स्टिट्यूटमधे नोकरीच्या मुलाखतीसाठी गेले. ती मुलाखत सायरस पूनावाला यांनी घेतली होती. मुळात तेव्हा त्यांना या नोकरीची फारशी गरजही नव्हती. सहज द्यायची म्हणून त्यांनी ती मुलाखत दिली. काही दिवसांनी पूनावालांनी कॉल करून त्यांची निवड झाल्याचं कळवलं. जाधवांसाठी ही मोठी संधी होती. त्यांनी सिरमची नोकरी स्विकारली आणि तिथं जे चिकटले, ते कायमचेच!

# गल्ली ते थेट दिल्लीपर्यंत 'दीपपर्व'चा आवाज

















नवी दिल्ली/बीड : 'दीपपर्व२०२१' विशेषांकाचे राजकीय दिग्गजांकडून कौतुक झाले आहे. गल्ली ते थेट दिल्लीपर्यंत दीपपर्वचा आवाज घुमला. कल्पक दृष्टीकोन आणि आकर्षक मांडणीमध्ये दीपपर्व सर्वांगसुंदर झाला असल्याच्या प्रतिक्रिया दिग्गजांनी व्यक्त केल्या.

'दीपपर्व'चा अंक राष्ट्रवादीचे सर्वेसर्वा तथा खासदार शरदचंद्र पवार, केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री तथा रिपाइंचे राष्ट्रीय अध्यक्ष रामदास आठवले, केंद्रीय पर्यटन राज्यमंत्री श्रीपाद नाईक, शिवसेनेचे खासदार तथा दैनिक सामनाचे कार्यकारी संपादक संजय राऊत, भाजपाचे राष्ट्रीय महासचिव विनोद तावडे, ठाण्याचे शिवसेना खासदार डॉ.श्रीकांत शिंदे, शिवसेना वैद्यकीय मदत कक्षाचे प्रमुख तथा ज्येष्ठ पत्रकार मंगेश चिवटे, महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघाचे प्रदेशाध्यक्ष वसंत मुंडे, लोकनेते सुंदरराव सोळंके सहकारी साखर कारखान्याचे कार्यकारी संचालक महादेव घोरपडे, अभियंता जे.पी.गंगवार, माजलगाव ग्रामीण पोलीस ठाण्याचे निरीक्षक प्रकाश मुंडे, जे.के. कंस्ट्रक्शन्सचे संचालक जाफेर खान, वसंतराव काळे पत्रकारिता महाविद्यालयाचे उपप्राचार्य बप्पासाहेब हावळे, राष्ट्रवादी किसान सेलचे तालुकाध्यक्ष सचिन सोळंके आदी मान्यवरांना भेट देण्यात आला.

(सर्व छायाचित्रे : वर्तमान टीम)

# पत्रकार जितेंद्र सिरसाट, अशोक खाडे यांना मुकनायक पुरस्कार

### माजलगाव भुषण पुरस्काराने थावरे, मनसबदार, गोंडे, फुलगे, यादव, आभारे यांचाही होणार सन्मान

▶ प्रतिनिधी



माजलगाव : येथील पत्रकार सुरक्षा समितीच्या वतीने मुकनायक व माजलगाव भूषण पुरस्कार देण्यात येणार असून मुकनायक पुरस्कारासाठी बीड येथील निर्भीड पत्रकार व दैनिक पुण्यभूमीचे कार्यकारी संपादक जितेंद्र सिरसाट व दैनिक आदर्श गावकरीचे माजी उपसंपादक पत्रकार अशोक खाडे यांना जाहिर झाला असून माजलगाव भूषण पुरस्कार शेतकरी संघर्ष समितीचे संस्थापक अध्यक्ष गंगाभिषण थावरे, माजलगाव प.सं.चे उपसभापती डॉ.वसिम मनसबदार, स्मार्ट आदर्श ग्राम पुरस्कार मिळालेले मोठेवाडीचे सरपंच आविनाश गोंडे, ज्ञानेश्वरी अर्बनचे मुख्य कार्यकारी अधिकारी राहुल फुलगे, बडा बिझनेसचे शिवहारी यादव व माजलगाव तलाठी संघटनेचे अध्यक्ष रूपचंद आभारे यांना जाहिर करण्यात आला असुन या पुरस्काराचे वितरण मुकनायक दिनी विविध मान्यवरांच्या उपस्थितीत पार पडणारअसल्याची माहिती, पत्रकार सुरक्षा समितीचे जेष्ठ पत्रकार प्रदिप कुलकर्णी व पत्रकार सुरक्षा समितीचे अध्यक्ष बाळासाहेब आडागळे यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे दिली आहे.

माजलगाव पत्रकार सुरक्षा समिती शाखा माजलगावच्या वतीने यावर्षी पत्रकारीता क्षेत्रात उत्कृष्ट काम करणाऱ्या पत्रकारासह माजलगाव तालुक्यातील सामाजिक कार्यात, आरोग्य रूग्ण सेवेमध्ये, उद्योजक, ग्रामपंचायत, सहकारासह इतर क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या बीड जिल्ह्याच्या व माजलगाव तालुक्याच्या मातीतील व्यक्तीस मुकनायक व माजलगाव भूषण पुरस्कार देऊन यावर्षापासून सन्मानीत करण्यात येणार आहे. त्याचप्रमाणे यावर्षीचे पत्रकारीतेतील योगदानाबद्दल बीड येथील निर्भिड पत्रकार तथा दैनिक पुण्यभूमीचे कार्यकारी संपादक जितेंद्र सिरसाट व माजलगाव तालुक्यातील खाडेवाडी येथील उत्कृष्ट पत्रकार तथा दैनिक आदर्श गावकरीचे माजी उपसंपादक पत्रकार अशोक खाडे यांना जाहीर करण्यात आला असून, माजलगाव भुषण पुरस्कारा मध्ये मराठवाडा शेतकरी संघर्ष समितीचे संस्थापक अध्यक्ष गंगाभिषण थावरे (सामाजिक कार्य), माजलगाव पंचायत समितीचे उपसभापती डॉ.वसिम मनसबदार (रूग्णसेवा), माजलगाव तालुक्यातुन प्रथम स्मार्ट आदर्श ग्राम पुरस्कार प्राप्त मोठेवाडी ग्रामपंचायतचे सरपंच अविनाश गोंडे (आदर्श सरपंच), ज्ञानेश्वरी आर्बनचे मुख्य कार्यकारी अधिकारी राहुल फुलगे (सहकार), बडा बिझनेसचे शिवहारी यादव, माजलगाव तलाठी संघटनेचे अध्यक्ष रुपचंद आभारे (उत्कृष्ठ तलाठी) यांना माजलगाव भुषण पुरस्कार जाहीर झाले असुन मुकनायक व माजलगाव भुषण पुरस्काराचे वितरण लवकरच मुकनायक दिनी विविध नामांकित मान्यवरांच्या उपस्थितीत भव्यदिव्य कार्यक्रमात हा पुरस्कार वितरण सोहळा पार पडणार असल्याची माहिती माजलगाव सुरक्षा समितीचे जेष्ठ पत्रकार तथा माजलगाव परीसरचे संपादक प्रदिप कुलकर्णी, पत्रकार सुरक्षा समितीचे अध्यक्ष बाळासाहेब आडागळे, उपध्याक्ष ज्योतिराम पाढंरपोटे, सचिव आमर साळवे, संघटक विजय कापसे, पत्रकार राजेभाऊ पाष्टे, पत्रकार नय्युम आत्तार, पत्रकार वसंत परसे यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे दिली आहे.

# चोरटे सुसाट; पोलिस मात्र झोपेत!

### माजलगाव : अनेक प्रकरणांचा तपास लागेना 'जैसेथे'

▶ प्रतिनिधी

माजलगाव : शहरालगत असलेल्या येथील शहर पोलीस ठाण्यांतर्गत येत असलेल्या भाटवडगाव व खंडोबा मंदिर परिसरात झालेल्या चोरीचा व बँकेसमोरून पाच लाखांची बॅग चोरीचा तीन आठवड्यांनतरही तपास लागलेला नसल्याने घबराटीचे वातावरण आहे.

भाटवडगाव येथील वयोवृद्ध असलेले पती-पत्नी लक्ष्मणराव शिंदे व सावित्रीबाई शिंदे यांना घरी तीन आठवड्यांपूर्वी पहाटे सहा चोरट्यांनी घराचा दरवाजा तोडून त्यांना मारहाण करून अडीच लाख रुपयांचे दागिने व रोख रक्कम पळवले होते. शहर पोलिसांनी श्वान पथक व ठसे तज्ज्ञांना पाचारण करूनही काही उपयोग झाला नव्हता. त्यानंतर दोन दिवसाने खंडोबा मैदानात असलेल्या सय्यद सोफियान आसेफ यांच्या घरी चोरी झाली होती. तसेच ८ डिसेंबर रोजी सागर दुगड यांच्या मुनिमाची बॅग बँकेसमोरून दिवसाढवळ्या पळवलेली असताना याचा देखिल अद्याप तपास लागलेला नाही.

या तीन चोऱ्यांपैकी एकाही चोरीत संशयितांना पोलिसांनी ताब्यात घेतल्याचे आढळून आलेले नाही. ३ आठवड्यांनंतरही तपास लागलेला नाही. यामुळे शहर पोलिसांबाबत शहर पोलिसांविरोधात नागरिकांमधून रोष निर्माण होताना दिसत आहे. पोलिसांनी याचा शोध लावण्याची मागणी केली जात आहे. तपास लागत नसतांना चोऱ्या मात्र सुरुच असल्याने नागरिकांत दहशतीचे वातावरण आहे.

## ज्येष्ठ पत्रकार उमेश मोगरेकर यांचा गौरव




माजलगाव : पत्रकार संघाचे अध्यक्ष तथा जेष्ठ पत्रकार उमेशजी मोगरेकर यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा देताना रिपोर्ताजचे संपादक बाबा श्रीहरी देशमाने, जिल्हा पत्रकार संघाचे अध्यक्ष तुकाराम येवले, मराठवाडा अर्बनचे चेअरमन सतिष सावंत, पत्रकार गणेश शिंदे, अतुल चांदमारे.

# माजलगाव पत्रकार संघाचे पुरस्कार घोषित

## खासदार शरद पवार, देवेंद्र फडणवीस आणि जितेंद्र आवाड आदींची उपस्थिती लाभणार

## डॉ.सुरेश साबळे, डॉ.मिलिंद आवाड, सचिन चपळगावकर यंदाच्या पुरस्काराचे मानकरी








प्रतिनिधी

माजलगाव : मराठी पत्रकार परिषद मुंबई संलग्न माजलगाव तालुका पत्रकार संघाच्या वतीने देण्यात येणारा यंदाचा दर्पण पुरस्कार सचिन चपळगावकर यांना जाहीर करण्यात आला आहे. समाजभूषण पुरस्कार डॉ.मिलिंद आवाड आणि माजलगाव भूषण पुरस्कार डॉ.सुरेश साबळे यांना जाहीर करण्यात आल्याची घोषणा अध्यक्ष हरीष यादव यांनी केली आहे. या पुरस्कार वितरण सोहळ्यासाठी राष्ट्रवादी काँग्रेसचे सर्वेसर्वा शरद पवार, विरोधी पक्षनेते देवेंद्र फडणवीस, गृहनिर्माणमंत्री जितेंद्र आव्हाड यांची प्रमुख उपस्थिती असणार आहे.

माजलगाव तालुका पत्रकार संघाच्या वतीने मागील ७ वर्षापासून दर्पण दिनाचे औचित्य साधून दर्पण पुरस्कार वितरण सोहळा घेतला जातो. विविध क्षेत्रात आपल्या कार्याचा ठसा उमटवलेल्या माजलगावच्या मातीतील मान्यवरांना या निमित्ताने पत्रकार संघाकडून सन्मानित केले जाते. याच अनुषंगाने या वर्षीचा दर्पण पुरस्कार पत्रकार सचिन चपळगावकर यांना जाहीर झाला आहे. तर जेएनयू, दिल्ली विद्यापीठात माजलगावचा ठसा उमटवणारे मानवी हक्क अभियानाचे अध्यक्ष डॉ.मिलिंद आवाड यांना समाजभूषण तर वैद्यकीय क्षेत्रात माजलगावची मान उंचावणारे जिल्हा शल्यचिकित्सक डॉ.सुरेश साबळे यांना माजलगाव भूषण पुरस्काराने सन्मानित करण्यात येणार आहे. पत्रकार पांडुरंग उगले यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित बैठकीत बीड जिल्हा उपाध्यक्ष सुभाष नाकलगावकर, सचिव रत्नाकर कुलथे, माजी अध्यक्ष दिलीप झगडे यांच्या निवड समितीने पुरस्कार विजेत्यांची निवड केली. जानेवारी महिन्यात दिमाखदार सोहळ्यात मान्यवरांच्या हस्ते हा पुरस्कार वितरण सोहळा पार पडणार आहे.

# राष्ट्रसंत गाडगेबाबा यांना पुण्यतिथीनिमित्त अभिवादन

प्रतिनिधी

माजलगाव : दीनदुबळे, अनाथ अपंगाची सेवा, अज्ञान, अस्वच्छता व अंधश्रध्दा बरसलेल्या समाजाचा विकास करण्याचे व्रत ज्यांनी हाती घेतलेले राष्ट्र संत गाडगेबाबा यांची माजलगावात परीट समाजाच्या वतीने पुण्यतिथीनिमित्त त्यांच्या पावन स्मृतीस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.



माजलगाव शहरातील राष्ट्रसंत गाडगेबाबा समाजमंदिर (मठ) बायपास रोड येथे सोमवार, दि.२० डिसेंबर रोजी सकाळी १० वाजता राष्ट्रसंत गाडगेबाबा यांच्या ६५ व्या पुण्यतिथीनिमित्त बाबांच्या प्रतिमेस पुष्पहार व पुष्प वाहून अभिवादन करण्यात आले. या वेळी समाजाचे राज्य उपाध्यक्ष सर्जेराव भागवत, विश्वनाथ शिंदे, तालुकाध्यक्ष जगन्नाथ शिंदे, युवा तालुकाध्यक्ष श्रीराम मोताळे, चंद्रकांत मोरे, लक्ष्मण वाघमारे, नंदू मोरे, अनिल मोताळे, रामा भागवत, शेषराव भागवत, बंडु सौंदर, अशोक भागवत, इंद्रजीत शेलार, संजय एडके, पप्पू शिंदे, रघुनाथ मोताळे, नाथा महाराज जाधव, बाळु एडके, अविनाश शेलार, सुदर्शन भागवत, शिवाजी व्यवहारे, दता भंडारे, ज्ञानोबा नवले, दता नवले, महादेव ननाळे, संतोष राऊत, बाबुराव भागवत,सुरेश भंडारे, बाळु शेलार, बंडु शेलार, माऊली शिंदे, कृष्णा शिंदे यांच्यासह मोठ्या संख्येने समाज बांधव उपस्थित होते.



# श्री स्वामी समर्थ सेवा केंद्रात दत्त जयंती उत्साहात

प्रतिनिधी

माजलगाव : श्री दत्त जयंतीनिमित्त येथील श्री स्वामी समर्थ सेवा केंद्रात परमपूज्य गुरुमाऊलींच्या आशिर्वादाने अखंड नाम, जप व यज्ञ सप्ताह मोठ्या उत्साहात झाला.

दि १२ ते १९ दरम्यान श्री गुरुचरित्र, सुलभ भागवत, नवनाथ पारायणे, श्रीपाद श्रीवल्लभ चरित्र पारायणे तसेच गणेश याग, मनोबोध याग, रुद्र मल्हारी याग, चंडी याग, स्वामी याग, विष्णू याग, गीताई याग, नित्य स्वाहाकार, अखंड प्रहरे अशा विविध अध्यात्मिक उपक्रम घेण्यात आले शिवाय सात दिवस बालसंस्कार विभागाच्या वतीने शिशु संस्कार शिबीर घेण्यात आले, मार्गशीर्ष पौर्णिमेला दुपारी १२:३९ वाजता गुरुचरित्राचा चौथा अध्याय पठण करुन दत्त जयंती साजरी करण्यात आली.

# फेडरेशन ऑफ मल्टीस्टेटच्या संचालकपदी ॲड.रविंद्र कानडे

प्रतिनिधी

पुणे : राष्ट्रीय स्तरावरील फेडरेशन ऑफ मल्टीस्टेटच्या २०२१ ते २०२५ या कार्यकाळासाठी नुकतीच संचालक मंडळाची निवडणूक झाली. त्यामध्ये श्री मंगलनाथ मल्टीस्टेटचे मुख्य कार्यकारी अधिकारी ड.रविंद्र कानडे यांची संचालकपदी बिनविरोध फेरनिवड करण्यात आली.



फेडरेशन ऑफ मल्टीस्टेट हे देशातील कार्यरत असणाऱ्या सर्व मल्टीस्टेटच्या विकासात्मक धोरणावर काम करणारी एकमेव संस्था आहे. मल्टीस्टेट संस्थांना येणाऱ्या अडीअडचणी व त्यावर मार्ग काढण्यासाठी देशभरात प्रशिक्षण शिबिराचे आयोजन करण्यात येते त्यामुळे संस्थेच्या कार्याला दिशा मिळून सहकार चळवळ भक्कम होते.

ॲड.रविंद्र कानडे हे मागील काळात देखिल फेडरेशन ऑफ मल्टीस्टेटच्या संचालकपदी विराजमान होते. त्यांनी मागील कार्यकाळामध्ये बीड जिल्ह्यातील मल्टीस्टेट संस्थेचे अनेक प्रश्न राष्ट्रीय स्तरावर फेडरेशन ऑफ मल्टीस्टेट मध्ये मांडले. त्यावर काम करत अनेक प्रश्न मार्गी लावले त्यांच्या या कार्याची दखल घेत, त्यांची कामाची धडपड व उत्साह पाहता त्यांना अधिक जबाबदारी देण्याचे ठरून त्यांना पुन्हा एकदा त्यांची संचालकपदी बिनविरोध फेर निवड करण्यात आली. फेडरेशन ऑफ मल्टीस्टेटचे अध्यक्ष तथा साई संस्थानचे विश्वस्त ड.सुरेश वाबळे व सर्व संचालक मंडळ यांचे ड.रविंद्र कानडे यांच्याकडून मनःपूर्वक आभार व्यक्त करण्यात आले. झालेल्या निवडणुकीत मिळालेल्या यशाबद्दल सर्व स्तरावरून ड.कानडे यांचे कौतुक होत असून त्यांच्यावर शुभेच्छांचा वर्षाव होत आहेत.

# ...तर फेटा बांधणार नाही : पंकजा मुंडे

प्रतिनिधी

बीड : राज्यात होऊ घातलेली नगरपंचायत निवडणूक ही काळी निवडणूक असल्याचे विधान भाजप नेत्या पंकजा मुंडे यांनी केले आहे. बीड जिल्ह्यातील आष्टी येथे आयोजित जाहीर सभेत पंकजा मुंडे बोलत होत्या. यादरम्यान आघाडी सरकारवर निशाणा साधत ओबीसीच्या राजकीय आरक्षणाच्या पार्श्वभूमीवर येणाऱ्या २६ जानेवारी पासून महाराष्ट्राचा दौरा करणार असल्याचे देखिल पंकजा मुंडे म्हणाल्या आहेत. तसेच ओबीसी आरक्षण सुरक्षित होईपर्यंत मी हार स्वीकारणार नाही तसेच फेटा देखील बांधणार नाही, असे प्रतिपादन पंकजा मुंडे यांनी केले आहे.






आधुनिक विचारांचे वर्तमान
हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक आणि **संपादक : भगीरथ गौरीशंकर तोडकरी,** यांनी तुळजा भवानी पब्लिकेशन ,माजलगाव ता.माजलगाव जि. बीड 431131 (महाराष्ट्र) येथे छापून आधुनिक विचारांचे वर्तमान कार्यालय, 23,मुख्य रस्ता, मस्जिद चौक, माजलगाव ता.माजलगाव जि.बीड येथे प्रसिद्ध केले. ईमेल : vartmaneditor@gmail.com भ्रमणध्वनी : **9423209823** RNI : MAHMAR/2018/76928, अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या, लेख, व्यक्त झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (सर्व वाद माजलगाव न्यायालय अंतर्गत) Postal REG No : L/92/RNP/Beed/2020-2022.